# बास्केटबॉल स्पर्धेत संत गाडगेबाबा आश्रमशाळेची बाजी

**मुंबईत प्रथमच** हाय - फाय फाऊंडेशनतर्फे तोलानी महाविद्यालयाच्या मैदानात बास्केट बॉल स्पर्धेचे आयोजन केले होते. १६ वर्षांखालील मुले व १३ वर्षांखालील मुली व मुले अशा तीन गटांत ही स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत २१ संघांनी सहभाग घेतला होता. प्राथमिक फेरीत एकूण १६ शाळामध्ये मुंबई महानगर पालिकेच्या १५ शाळा व वज्रेश्वरी येथील, श्री संत गाडगेबाबा आदिवासी आश्रम शाळा ( भिवाळी ) अंतिम फेरीत होत्या. अंतिम फेरीत १६ वर्षांखालील मुले व १३ वर्षांखालील मुली या दोन्ही गटांत श्री संत गाडगेबाबा आदिवासी आश्रम शाळा, अंतिम विजयी तर १३ वर्षांखालील मुले या गटात घाटकोपर महानगर पालिका शाळा विजयी घोषित करण्यात आली.

लोकसत्ता Thu, 13 April 2017
epaper.loksatta.com/c/18279365